(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली आहे. त्यामुळे....

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपणास बोलण्याची संधी देण्यात येईल.

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

मुंबई, ठाणे तसेच अकोला जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयात वस्तुंची जादा दराने केलेली खरेदी

(१) * **३८२० *श्री.प्रकाश* बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे तसेच अकोला जिल्ह्यातील सार्वजनिक रुग्णालये तसेच राज्य कामगार विमा विभागाच्या रुग्णालयात तांदूळ, गहू, साखर, गोडे तेल, मसाले तसेच अंडी, कोंबड्या आणि फळे यांची बाजारभावापेक्षा जास्त दराने खरेदी झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागाची लूटमार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत मा.आरोग्य मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान आरोग्य संचालक यांना निदेश दिले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती जणांवर कारवाई करण्यांत आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ***?***

प्रा.राम शिंदे, डॉ. दीपक सावंत यांच्याकरिता **:** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) याबाबत संपूर्ण चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) चौकशी पूर्ण झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : ***सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याबाबतचे आदेश देण्यात आल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. माझे लेखी उत्तरामुळे समाधान झाले आहे. त्यामुळे मी उप प्रश्न विचारु इच्छित नाही.***

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

SJB/ 13:00

जायकवाडी धरणातून गोदावरी नदी पात्रातील बॅरेजमध्ये पाणी सोडणेबाबत

(२) * **३६७४ *श्री.अमरसिंह* पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणातून गोदावरी नदी पात्रातील बॅरेजमध्ये पाणी सोडण्याची मागणी शेतकरी, ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीसाठी शेतकरी व ग्रामस्थ यांनी आंदोलनाची भूमिका घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोदावरी नदीकाठच्या गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये म्हणून नदीपात्रातील बॅरेजमध्ये पाणी सोडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, धरणातून पिण्यासाठी आणि जनावरांसाठी पाणी आवश्यक असल्यामुळे पाणीपट्टी अथवा शुल्क आकारणी न करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, या प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ***?***

***श्री.विजय शिवतारे,* श्री. गिरीष महाजन *यांच्याकरिता* :** (१) व (२) होय.

(३) औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील बॅरेजसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचे मागणीप्रमाणे आवश्यकतेनुसार पिण्यासाठी व जनावरांसाठी पाणी सोडण्यात आलेले आहे.

(४) शासनाच्या प्रचलित नियमानुसार पाणीपट्टी आकारणी केली जाते. पाणीपट्टी अथवा शुल्क आकारणी न करणे, ही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, गोदावरी नदीच्या पात्रात असलेल्या 5 बॅरेजेसला लागणारे एकूण पाणी 223 दशलक्ष घन मीटर आहे. त्यावर जालना आणि बीड जिल्ह्यातील साधारणपणे 60 हजार हेक्टर जमिनीचे अवलंबित्व आहे. तसेच 113 गावांच्या पिण्याच्या पाणी पुरवठा योजना अथवा जनवरांसाठी लागणाऱ्या पाण्याची उपलब्धता या बॅरेजेसमधून होणारे ते एक स्त्रोत आहे. अजून तीन महिने उन्हाळा राहणार आहे. या चार बॅरेजेसमध्ये 5-5 एमएमक्यूब

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पाणी सोडले पाहिजे, अशा प्रकारची लेखी विनंती मी पत्राद्वारे माननीय जलसंपदा मंत्र्यांकडे

केलेली आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, त्या भागातील लोकांना, शेतीला आणि जनावरांना पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासन योग्य तो निर्णय तातडीने घेणार आहे काय ? तसेच बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पाणीपट्टी भरली तर तातडीने पाणी सोडण्यात येईल अशा प्रकारचे पत्र प्रत्येक ग्रामपंचायतीला पाठविले आहे. एकीकडे दुष्काळामुळे त्या भागात 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असल्यामुळे त्या भागातील गावांतील इतर वसुली थांबविण्यात आलेली आहे. असे असताना पाणीपट्टी वसूल केली जात असेल तर ते चुकीचे होईल. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, शासनाने पाणीपट्टी वसुलीचा आग्रह धरु नये अशी जनतेची जी मागणी आहे ती शासन मान्य करणार काय ?

गिरीष महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे तो खरा आहे. सन्माननीय सदस्यांनी जायकवाडी धरणातून पाणी सोडण्याबाबत मागणी केली होती. तशा प्रकारचे त्यांनी प्रत्यक्ष भेटून मला पत्र दिले होते. त्यानुसार पाणी सोडण्यात आलेले आहे. ते पाणी त्या ठिकाणी पोहचले असून त्या पाण्याचा उपयोग केला जात आहे. ज्या गावांना पिण्याच्या पाण्याची गरज होती त्यांना ते पाणी मिळालेले आहे. तसेच दुसरी बाब अशी की, एमडब्ल्यूआरआरने ठरवून दिलेल्या दरानुसारच त्या ठिकाणी पाणीपट्टी वसूल करण्यात येत आहे. 10 हजार लीटर पाण्यासाठी 1रुपये 58 पैसे दराने वसूल करण्यात येणारी पाणीपट्टी ही परवडणारी आहे आणि ती वसूल करणे बंधनकारक आहे. किंबहुना, ती वसूल करणे क्रमप्राप्त आहे. तो भाग दुष्काळी असल्यामुळे त्या ठिकाणी पाणीपट्टी वसूल करु नये, अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. परंतु अशा परिस्थितीत सरकारने अगोदर पाणीपट्टीमध्ये माफी दिलेली नाही. मी पुन्हा एकदा सांगतो की, प्रचलित दरानुसार अगदी नगन्य स्वरुपात पाणीपट्टी आकारणी करण्यात येत असल्यामुळे ती देण्यास हरकत नसावी.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी स्पेसिफिक विचारतो की, जायकवाडी धरणात या वर्षी नेमका किती पाणी साठा आहे आणि या वर्षी आवर्तन सोडल्याने रब्बी पिकाखाली किती क्षेत्र

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आणले आहे ?

06-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-4

SJB/ 13:00

ता.प्र.क्र.3674...

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, जायकवाडी धरणात 8.85 टीएमसी पाणीसाठा असून, 24 टीएमसी हा मृतसाठा आहे. तसेच विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार पिण्याच्या पाण्याचे नियोजन केले जाते. त्यांनी ठरविलेल्या प्रमाणानुसार पाणी देण्यात येते.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, गोदावरी नदी पात्रात औरंगाबाद-2, जालना-4, परभणी-3 आणि नांदेड-2 असे एकूण 11 बॅरेजेस आहेत. मराठवाड्यात आजच्या घडीला भीषण दुष्काळ आणि पाणी टंचाई आहे. जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बॅरेजेनिहाय एकूण किती मागणी जलसंपदा विभागाकडे प्राप्त झाली आहे, त्यावर शासनाने काय कार्यवाही केली आहे, तसेच प्रत्येक बॅरेजेसची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, त्यांनी या बॅरेजमध्ये 105 दशलक्ष घन मीटर पाणी सोडण्याची मागणी केली होती. त्यानुसार सर्व पाणी सोडण्यात आले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या संदर्भात आम्ही सभागृहामध्ये वारंवार मागणी केलेली आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "संबंधित जिल्हाधिकारी यांचे मागणीप्रमाणे आवश्यकतेनुसार पिण्यासाठी व जनावरांसाठी पाणी सोडण्यात आलेले आहे." महोदय, जिल्हाधिकारी हे मालक नाहीत. वास्तविक पाहता जनता, शेतकरी आणि लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केल्याप्रमाणे त्यांनी पाणी सोडण्याबाबतचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे, असे लेखी उत्तर अभिप्रेत होते. त्यामुळे सर्वप्रथम लेखी उत्तर बदलणे आवश्यक आहे. महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी निदर्शनास आणून दिले आहे की, त्या भागात दुष्काळ आहे. दुष्काळ असताना त्या भागात पाणीपट्टी वसूल करु नये. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, दुष्काळी भागातील विजेचे बिल ज्याप्रमाणे शासन भरते त्या धर्तीवर शासन त्या भागातील नगन्य असलेली शेतकऱ्यांच्या पाणीपट्टीची रक्कम स्वतःच्या निधीतून भरणार काय ?

श्री.गिरीष महाजन : महोदय, त्या भागात टंचाई आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु जलसंपदा विभाग टंचाईच्या काळात पैसे देत नाही किंवा पाणीपट्टीची रक्कम भरत नाही. परंतु मी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-5

SJB/ 13:00

ता.प्र.क्र.3674...

श्री.गिरीष महाजन....

आणि आपण, या विषयी आमचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे यांच्यासोबत चर्चा करु या. त्यांच्याकडे मदत व पुनर्वसन विभाग आहे. त्यांना या बाबत विनंती करु या. त्यानंतर या बाबतीत ठरवू या.

उप सभापती : ता.प्र.क्र.3436.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय,....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय,....

उप सभापती : मी या प्रश्नावर सन्माननीय सदस्यांना चार उपप्रश्न विचारण्याची संधी दिलेली आहे. ठीक आहे. आता केवळ एक उपप्रश्न विचारावा.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, जायकवाडी धरणाच्या 1985 च्या मंजूर प्रकल्प अहवालामध्ये धरणातून नदी पात्रातील बॅरेजेसमध्ये पाणी सोडण्याची तरतूद नाही. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, शासन या संदर्भात तरतूद करणार काय किंवा या बाबतीत शासनाची नेमकी काय भूमिका आहे ?

श्री.गिरीष महाजन : महोदय, हे खरे आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी जे विचारलेले आहे, त्यानुसार विचार करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मौजे उमरसरा (ता.जि.यवतमाळ) ग्रामपंचायत परिसरातील

रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

u(३) * **३४३६ *श्री.संदिप* बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमरसरा (ता.जि.यवतमाळ) ग्रामपंचायत परिसरातील निखील नगरातील रस्ते खड्डेमय झालेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर रस्त्यांची कामे तातडीने करणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ***?***

श्री.दीपक केसरकर, श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता : (१) हे खरे आहे.
(२) होय, पंचायत समिती यवतमाळ येथील विस्तार अधिकारी (पंचा.) व शाखा अभियंता यांच्या मार्फत पाहणी करण्यात आली आहे.
(३) मौजे उमरसरा (ता.जि.यवतमाळ) ग्रामपंचायत परिसरातील निखील नगर वॉर्ड क्र. १ चा रस्ता सुमारे २ कि.मी. परिसरामध्ये व्यापलेला आहे. हा विस्तीर्ण परिसर खड्डेमय झालेला होता. तथापि, सन २०१४-१५ मध्ये ग्रामपंचायत उमरसरा येथे लेखाशीर्ष २५१५१२३८, गावांतर्गत मूलभूत सुविधा या योजनेंतर्गत रस्ता खडीकरणाचे रु. ५ लक्ष चे काम मंजूर करण्यात आले असून सदर काम पूर्ण झालेले आहे. तसेच सदर कामावर ग्रामपंचायतीमार्फत रु. २.९० लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, हा प्रश्न यवतमाळ जिल्ह्यातील उमरसरा ग्रामपंचायत परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबतचा आहे. पंचायत समिती यवतमाळ येथील विस्तार अधिकारी (पंचायत) आणि शाखा अभियंता यांच्यामार्फत सदरहू रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, विस्तार अधिकारी आणि शाखा अभियंता यांनी पाहणी केलेल्या एकूण रस्त्यांपैकी किती रस्ते खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे ? दरवर्षी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-7

SJB/ 13:00

ता.प्र.क्र.3436....

श्री.ख्वाजा बेग....

लेखाशीर्ष-2515 खाली गावांतर्गत मूलभूत सुविधा या योजनेंतर्गत सुयीसुविधांची कामे मंजूर करण्यात आली होती. परंतु ती कामे माहे ऑक्टोबर ते डिसेंबर-2014 या दरम्यान रद्द करण्यात आली आहेत हे खरे आहे काय ? ज्या ग्रामपंचायतींची कामे रद्द करण्यात आली आहेत त्या ग्रामपंचायतींना शासन पुन्हा अनुदान उपलब्ध करुन देणार काय ?

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3436....

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, हा प्रश्न उमरसरा गावातील रस्त्यांच्या संदर्भातील आहे. सदर रस्त्यांची पाहणी केली आहे. गावातील 5 रस्त्यांची लांबी 2 कि.मी. आहे. लांबे घरापासून बागेश्वर घरापर्यंत, बागेश्वर घरापासून मुणेश्वर घरापर्यंत, मुणेश्वर घरापासून नरांजे घरापर्यंत, नरांजे घरापासून सावळे घरापर्यंत आणि लाखेकर ते मुन्ना महाराज पर्यंत अशा सर्व रस्त्यांच्या कामांच्या संदर्भात निविदा काढण्यात आलेल्या आहेत. आतापर्यंत त्यावर 2 लाख 97 हजार रूपये खर्च झाला आहे. उर्वरित कामांची रक्कम रद्द केलेली नाही. रक्कम रिलिज केली नव्हती. दिनांक 1 ऑगस्ट, 2014 ला 3 लाख रूपये वितरित केले होती. उर्वरित 2 लाख रूपये दिनांक 2 मार्च, 2015 ला वितरित केले आहेत. सर्व कामे पूर्ण होणार आहेत.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, उमरसरा गावातील रस्ते खड्डेमय झाले आहेत. सदर रस्त्यांची पाहणी शाखा अभियंत्यांनी कधी केली, रस्त्त्यांच्या खडीकरणाची 5 लाख रूपयांची काम कधी पूर्ण झाली, रस्त्याच्या खडीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक किती रकमेचे होते ?

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, मी उत्तर दिले आहे की, त्या कामांसाठी 5 लाख रूपये मंजूर झाले आहेत, त्यापैकी 2 लाख 90 हजार रूपये खर्च झाले आहेत. उर्वरित रक्कम 2 मार्चला वितरित केली आहे. उर्वरित कामे सुध्दा पूर्ण होतील.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदर पाहणी शाखा अभियंत्यांनी कधी केली, 5 लाख रूपयांचे काम कधी पूर्ण झाले, सदर कामांचे अंदाजपत्रक किती रकमेचे होते ?

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, सदर माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या प्रश्नाला अनुषंगिक आहे. आता माझ्याकडे माहिती नाही, माहिती पटलावर ठेवतो असे माननीय राज्यमंत्र्यांनी बोलणे योग्य नाही.

सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यात 2515 या लेखाशीर्षांतर्गत किती रकमेची किती कामे होती, त्यातील किती मंजूर झाली, कामांची एकूण रक्कम किती होती ? शासनाने आता कामे सुरू ठेवण्याबाबत परवानगी दिली आहे. राज्यात 2515 लेखाशीर्षांतर्गत मंजूर झालेली कामे किती होती आणि आता किती कामांना स्थगिती दिली आहे ? ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3436....

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, राज्यात 2515 लेखाशीर्षांतर्गत 22 कोटी 55 लाख रुपयांच्या कामांना मंजूर दिली होती, त्यापैकी 6 काटी 55 लाख रुपयांची कामे पूर्ण झाली नव्हती, त्यामुळे दिलेली मंजुरी रद्द करण्यात आली. नवीन आदेश दिले आहेत. कामांना सुरुवात झाली नव्हती, वर्क ऑर्डर दिली नव्हती. 6.55 लाख रुपयांची कामे रद्द केली असली तरी या जिल्ह्याला 8 कोटी 4 लाख रुपयांची नवीन कामे मंजूर करून दिली आहेत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, उमरसरा गावात रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. 5 लाख रुपयांची कामे मंजूर करण्यात आल्याचे, 2 लाख 90 हजार रुपये खर्च करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मग अद्याप त्या रस्त्यांची दुरावस्था का संपली नाही, खड्डे का बुजले नाहीत, रस्ता का चांगला झाला नाही ?

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, उर्वरित 2 लाख रुपये दिनांक 2 मार्च, 2015 ला वितरित करण्यात आले आहेत. त्यामुळे खर्च होऊन ती कामे पूर्ण होतील. रस्त्याचे फोटो मागवून घेतले आहेत, त्यामध्ये सर्व खड्डे बुजविल्याचे दिसत आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्यात लेखाशीर्ष 2515 अंतर्गत मागच्या वर्षी अनेक कामे मंजूर करण्यात आली आहेत. परंतु सत्तांतर झाल्यानंतर काही कामे जाणवीपूर्वक रद्द करण्यात आली, कामांना स्थगिती देण्यात आली. सदर कामांना अगोदर स्थगिती देऊन नंतर ती रद्द करण्यात आली.

सभापती महोदय, लेखाशीर्ष 2515 अंतर्गत परळी पंचायत समितीमध्ये 3 कोटी 10 लाख रुपयांची कामे ग्रापंचायतीने केली. आतापर्यंत फक्त कामांची 2 कोटी रुपयांची देयके निघाली. आता पैसे नसल्यामुळे ग्रामपंचायत उर्वरित 1 कोटी 10 लाख रुपयांसाठी तडफड करीत आहे. लेखाशीर्ष 2515 अंतर्गत जी कामे झाली ती सुध्दा रद्द करण्यात आली. त्यामुळे तो निर्णय चुकीचा झाला आहे. शासन त्याबाबत पुनर्विचार करणार आहे का ?

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, ज्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली नव्हती अशीच कामे ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3436....

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, पटलावर चुकीचे चालले आहे. मी जबबदारीने सांगत आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर, वर्क ऑर्डर झाल्यानंतर, लेखाशीर्ष 2515 अंतर्गत असलेली कामे रद्द करण्यात आली आहेत. आज सुध्दा त्या कामांची देयके देणे बाकी आहे. रद्द केलेली कामे वेगळी आहेत. एका पंचायत समितीची जी कामे पूर्ण झाली त्यांचे सुध्दा दीड कोटी रुपयांचे देणे बाकी आहे. सदर बाबतीत सरकारची भूमिका काय आहे हे स्पष्ट झाले पाहिजे.

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितलेली माहिती पडताळून घेण्यात येईल आणि त्याचे उत्तर त्यांना पाठविण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मुरुड (जि.रायगड) येथील ग्रामीण मार्ग क्र. ७८ या रस्त्याच्या

दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत

(4) * **३८८८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६६३ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुरूड (जि.रायगड) शहरालगत १० कि.मी. अंतरावर असलेल्या ग्रामीण मार्ग क्र.७८ रस्त्यांच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(2) सदर कामासाठी निधीची तरतूद करण्यात आली नसल्यास माहे मार्च, २०१५ अखेर सदर रस्त्याचे काम निधीच्या तरतूदीसह व आवश्यक त्या मान्यतेसह पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दीपक केसरकर, श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता : (१), (2) व (३) मुरुड तालुक्यातील डोंगरी ते खोराबंदर हा मार्ग डांबरी पृष्ठभागाचा असून त्याची एकुण लांबी ०/३०० कि.मी. आहे. रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.७८ असा आहे. सदर रस्त्याच्या दुरूस्तीसाठी अंदाजे रु.५.०० लक्ष खर्च अपेक्षीत आहे. सदरच्या रस्ता दुरुस्तीच्या कामास ३०५४ मार्ग व पुल लेखाशिर्षा अंतर्गत मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव जिल्हा परिषद रायगड कडून जिल्हा नियोजन समिती रायगड-अलिबागकडे सादर केलेल्या असून सन २०१४-१५ साठी निधीची मागणी करण्यात आली आहे. निधी उपलब्ध होताच जिल्हा परिषदेमार्फत सदरचे काम हाती घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी मागच्या हिवाळी अधिवेशनात दिनांक 18 डिसेंबरला हा प्रश्न विचारला होता आणि त्यावेळी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी यास उत्तर दिले होते. त्यावेळी दिलेले उत्तर आणि आता दिलेले उत्तर यामध्ये फरक आहे. हा रस्ता मच्छिमारांच्या जेट्टीसाठी आहे. परंतु एमटीबीने तेथे बेकायदेशीर प्रवासी वाहतूक करण्यास सुरूवात केली आहे. शासनाने या संदर्भात हरकत घेतली आहे का, बेकायदेशीर प्रवासी वाहुकीमुळे तो रस्ता खराब होत आहे याची शासनाला जाणीव आहे का ?

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, जेट्टीच्या जवळ असणाऱ्या रस्त्यावरील माती निघून जाते त्यामुळे रस्त्यावर खड्डे पडतात या संदर्भातील हा प्रश्न आहे. या रस्त्याची दुरूस्ती किंवा बांधकाम मेरिटाईम बोर्डमार्फत होते. त्यानुसार मेरिटाईम बोर्डने 70 लाख रूपयांचा प्रस्ताव सुध्दा पाठविला आहे. प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा परिषदेला सूचना देण्यात आली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3888....

श्री. दीपक केसरकर ....

जिल्हाधिकाऱ्यांशी बोलण्यात आले आहे की, हा रस्ता पूर्ववत करण्यासाठी 5 लाख रुपये तातडीने खर्च येईल. तो खर्च केला जाईल. मेरिटाईम बोर्डचा 70 लाख रुपयांचा प्रस्ताव आलेला आहे, तो मंजूर झाल्यानंतर 70 लाख रुपयांचे काम करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. मूळ रस्ता मच्छिमाऱ्यांच्या जेट्टीसाठी आहे. मात्र तेथे बेकायदेशीर प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे तो रस्ता खराब झाला आहे. मच्छिमाऱ्याच्या जेट्टीसाठी असलेल्या रस्त्याचा वापर बेकायदेशीर प्रवासी वाहतुकीसाठी केलेला आहे. सदर रस्त्याचा उद्देश बदलण्यात आला आहे. शासनाने त्याला हरकत घेतलेली नाही. शासन या संदर्भात हरकत घेणार आहे का ?

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, सदर प्रश्नात मेरिटाईम बोर्डचा कोणताही उल्लेख नाही, जेट्टीवरून होणाऱ्या वाहतुकीचा उल्लेख नाही. मी याची संपूर्ण माहिती घेतली आहे. मुरूड शहरापासून 2 कि.मी. दूर राजपुरी येथून हा रस्ता जातो आणि खोडाबंदर येथे मिळतो ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावनांची दखल घेतली आहे. हा रस्ता लवकर दुरुस्त करण्याच्या संदर्भात मेरिटाईम बोर्डचा प्रस्ताव लवकर मंजूर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3888.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदय वेगळेच उत्तर देत आहेत.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मला उत्तर तरी पूर्ण करु द्यावे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, माननीय श्री.दीपक केसरकर हे अनुभवी असले तरी राज्यमंत्री म्हणून नवीन आहेत. यापूर्वी त्यांनी बराच काळ नगराध्यक्ष म्हणून काम केले आहे व त्यामुळे त्यांना प्रशासनाची चांगली माहिती आहे. परंतु, राज्यमंत्री पदाच्या जबाबदारीत रूळण्यासाठी त्यांना काही काळ लागणार आहे. आपण सर्वांनी त्यांना सांभाळून घेतले पाहिजे. आणखी असे की, ते आपले जुने सहकारी आहेत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ते या क्षेत्रात एवढे रूळले आहेत की, कॅबिनेट दर्जाचे दोन मंत्री महोदय त्यांच्या मागे बसले आहेत.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मच्छिमारांच्या जेटीपर्यंत जाणारा हा रस्ता आहे. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे मेरिटाईम बोर्डाला कळविण्यात येईल आणि मेरिटाईम बोर्डाचे काय म्हणणे आहे, हे सन्माननीय सदस्यांना कळवू.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, उत्तरात असे नमूद केले आहे की, "सदरचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून जिल्हा नियोजन समितीला सादर करण्यात आला आहे." माझा प्रश्न असा आहे की, सदर प्रस्ताव कधी पाठविण्यात आला आहे ?

सभापती महोदय, सन 2014-2015 हे आर्थिक वर्ष संपले आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषदेला सन 2015-2016 साठी नव्याने प्रस्ताव पाठवावा लागणार आहे. हा सुधारित प्रस्ताव कधीपर्यंत पाठविण्यात येईल आणि कधीपर्यंत अनुदान प्राप्त होईल ?

सभापती महोदय, या कामासाठी अंदाजे 5 लक्ष रुपये खर्च येणार आहे, असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. एवढ्या छोट्या रकमेसाठी सन्माननीय सदस्यांना वेळ व शक्ती खर्च करावी लागत आहे. त्यामुळे निधी उपलब्ध करून देऊन सदरचा प्रश्न निकाली काढण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3888.....

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, जिल्हा परिषदेकडून हे काम तातडीने हाती घेण्यात यावे, अशा सूचना दिलेल्या आहेत व त्याप्रमाणे रायगड जिल्हा परिषदेमार्फत हे काम हाती घेण्यात येईल.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पुणे येथील महाराष्ट्र वैधानिक मंडळाचे मुख्यालय
नाशिक येथे स्थलांतरीत करण्याबाबत

(5) *२८२२ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्याच्या विकासाच्या प्रादेशिक असमतोलाबाबत तोडगा काढण्यासाठी सध्या पुण्यात असलेले उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे मुख्यालय नाशिकला स्थलांतरीत करण्यांत यावे, अशी महत्वपुर्ण शिफारस अर्थतज्ञ डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त मंडळे यापुढे प्रादेशिक विकास मंडळे म्हणून ओळखली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, २० वर्षापूर्वी स्थापित या मंडळाची पुनर्रचना करतांना त्यांच्या कार्यकक्षा बदलाव्यात तसेच प्रदेशाकरिता पंचवार्षिक विकास आराखडा तयार करणे, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तो अंमलात आणणे इत्यादी शिफारशी या अहवालातून करण्यांत आल्यात, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, नाशिक येथे उक्त वैधानिक मंडळाचे मुख्यालय कार्यान्वयीत होणेसंदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यांत आली वा येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे मुख्यालय पुणे येथे नसून, मुंबई येथे आहे. सदर विकास मंडळाने मुख्यालय नाशिक येके स्थलांतरीत करण्याबाबत डॉ. केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीने शिफारस केलेली आहे.
(2) हे खरे नाही. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे स्थापनेपासूनच प्रादेशिक विकास मंडळे म्हणून ओळखली जातात.
(3) होय.
(4) व (५) डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेले अहवालाबाबत राज्य शासनाचा अद्याप निर्णय झालेला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, केळकर समितीचा अहवाल या अधिवेशनात चर्चेला येईल, असे आश्वासन राज्य शासनाने हिवाळी अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे का आणि या अधिवेशनाचा शेवटचा आठवडा सुरु आहे. या शेवटच्या आठवड्यात, या अहवालावर राज्य शासन चर्चा घडवून आणणार आहे का ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, केळकर समितीचा अहवाल दिनांक 3 डिसेंबर, 2014 रोजी मंत्रिमंडळाला सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने माननीय मंत्री वित्त व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली एक मंत्री समिती दिनांक 17 जानेवारी, 2015 रोजी गठीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2822.....

श्री.दीपक केसरकर.....

करण्यात आली आहे. माननीय जलसंपदा मंत्री, ऊर्जा मंत्री, शालेय शिक्षण मंत्री, उद्योग मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री या समितीचे सदस्य असून वित्त सचिव या समितीचे सदस्य सचिव आहेत. केळकर समितीच्या अहवालावर विविध विभागांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, पाणी पुरवठा, महिला व बालकल्याण, वित्त, उद्योग, कामगार, जलसंपदा, गृह, अल्पसंख्याक, अन्न व नागरी पुरवठा, पर्यटन, वने आणि सामान्य प्रशासन विभाग या विभागांनी त्यांच्या सूचना पाठविलेल्या आहेत. या समितीमध्ये या सूचनांवर विचार करण्यात येईल व त्याबाबत समिती योग्य तो निर्णय घेईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, एकूणच राज्याच्या नियोजनाच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. देश पातळीवर नियोजन आयोगाच्या संकल्पनेमध्ये बदल झाला आहे. त्याच धर्तीवर राज्य सरकारकडून नियोजनाचा आराखडा तयार करताना वैधानिक विकास मंडळांची पुनर्रचना होणार आहे का, होणार असेल तर उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे मुख्यालय नाशिक येथे हलविण्याबाबत केळकर समितीने केलेली शिफारस मान्य करण्यात येईल का, त्याची अंमलबजावणी करण्यात येईल का, तसे झाल्यास, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाची पूर्वीची उद्दिष्टे आणि बदल झाल्यानंतर निश्चित होणारी उद्दिष्टे यामध्ये काही फरक राहणार आहे का आणि त्या दृष्टीने फेररचना करण्याचा शासन विचार करणार आहे का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, राज्याच्या प्रत्येक विभागाचा समतोल विकास व्हावा, राज्य सरकारच्या माध्यमातून होणारा खर्च त्या विभागाच्या विकासासाठी खर्च व्हावा, अशी अपेक्षा असतानाही गेल्या अनेक वर्षात, अनेक क्षेत्रावर अन्याय झाला आहे. त्यामुळे अनुशेष निर्माण झाला व या अनुशेषाच्या संदर्भात सन 1994 मध्ये परिगणित केलेल्या अनुशेषानंतर पुन्हा त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

सभापती महोदय, डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल शासनाला सादर झाला आहे व सभागृहाच्या माध्यमातून तो सन्माननीय सदस्यांनाही उपलब्ध करून देण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांनी नाशिक येथे कार्यालय हलविण्याबाबत जो प्रश्न विचारला आहे, त्याचे उत्तर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2822.....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

आता अपेक्षित नाही. सध्या हे कार्यालय मुंबई येथे आहे. या अहवालावर सभागृहात विस्तृत, सखोल व सुक्ष्म चर्चा होणे अपेक्षित आहे व त्यासाठी सरकारच्या वतीने अनुकुल मत प्रदर्शित करण्यात आले आहे. आता सदर चर्चा कधी ठेवायची, याबाबतचा निर्णय कामकाज सल्लागार समितीमध्ये सभापती महोदयांनी घ्यायचा आहे. ही चर्चा आणि या संदर्भातील निर्णय झाल्यानंतर या चर्चेमध्ये जे मुद्दे उपस्थित होतील त्या मुद्यांचा अभ्यास करून सरकारच्या वतीने कोणत्या शिफारशी स्विकारायच्या याबाबतचा निर्णय सभागृहाच्या चर्चेतून करणार आहोत. हे खरे आहे की, योग्य प्रकारचे नियोजन व्हावे, अशी जी इच्छा सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे, ती बरोबर आहे. त्यासाठीच केंद्र सरकारने नीति आयोग गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्यासाठीच्या कक्षाही ठरविण्यात आल्या आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे (बसून) : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या नीति आयोगाचा काय संबंध आहे ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, प्रश्नकर्त्या सन्माननीय सदस्यांनी नीति आयोगाचा उल्लेख केल्यामुळे मी त्याबाबतचा खुलासा करीत आहे. परंतु, तसे उत्तर नको असेल तर मी एवढेच सांगतो की, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे मुख्यालय मुंबई येथून नाशिक येथे स्थलांतरित करण्याबाबत शासनाचा कोणताही निर्णय झालेला नाही, तशा प्रकारचे कोणतेही धोरण नाही. केळकर समितीने यासंदर्भात केलेल्या शिफारशीबाबत चर्चेअंती विचार करू.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, केवळ नाशिक येथे कार्यालय स्थलांतरित करण्याबाबतचा हा प्रश्न नाही. या प्रश्नाच्या प्रश्न भाग 3 अन्वये असे विचारण्यात आले आहे की, "असल्यास, 20 वर्षापूर्वी स्थापित या मंडळाची पुनर्रचना करताना त्यांच्या कार्यकक्षा बदलाव्यात तसेच प्रदेशाकरिता पंचवार्षिक विकास आराखडा तयार करणे, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ती अंमलात आणणे इत्यादी शिफारशी या अहवालातून करण्यात आल्यात, हे ही खरे आहे काय"

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2822.....

श्री.शरद रणपिसे.....

सभापती महोय, विदर्भ आणि मराठवाड्याचा विचार केला तर त्या भागात विकासात्मक तूट मोठ्या प्रमाणावर आहे, हे समितीने दाखवून दिलेले आहे. त्यामुळे या मंडळाची पुनर्रचना केली, मुख्यमंत्री महोदय किंवा ज्येष्ठ मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली तरी घटनेच्या 371 कलमाप्रमाणे सर्व अधिकार राज्यपाल महोदयांना आहेत. राज्यपाल महोदय ज्याप्रमाणे सांगतील त्याप्रमाणेच निधी वाटप करावा लागणार आहे. त्यामुळे पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे, असे वाटत नाही. पूर्वी प्रमाणेच विधिमंडळाचे अधिकार अबाधित ठेवण्याबाबत शासन विचार करणार आहे का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, विधिमंडळाचे अधिकार अबाधितच असतात. ही घटनात्मक तरतूद आहे. विधिमंडळाचे अधिकार काढून घेण्याचा अधिकार कोणत्याही समितीला नाही. राज्यपालांना दिलेले अधिकार घटनेने दिलेले आहेत. त्यामुळे विधिमंडळाने त्यांचे अधिकार काढून घेण्याची कोणतीही तरतूद नाही.

यानंतर श्री.वि.खर्चे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2822...

श्री.सुधीर मुनगंटीवार....

डॉ.विजय केळकर समितीने सर्व वैधानिक विकास महामंडळाची पुनर्रचना करण्याची शिफारस केली आहे. या समित्यांवर अशासकीय सदस्य नियुक्त करण्यात येतात. यासंदर्भात अशी शिफारस करण्यात आली आहे की, अशा नियुक्त्या करताना वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असावेत व कार्यकारी अध्यक्ष सिनिअर मंत्री असावेत. विदर्भ, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळे आहेत. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळात खानदेश व कोकण येतो. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाच्या माध्यमातून या दोन विभागांत विकासाची कामे करताना अडचणी येतात म्हणून यासंदर्भात समितीने शिफारस केली आहे. वैधानिक विकास महामंडळांची पुनर्रचना करताना समतोल व जिल्हानिहाय विकास व्हावा. या अहवालावर सभागृहात दोन दिवस सविस्तर चर्चा होणार आहे. त्यावेळी या संदर्भातील सविस्तर माहिती सभागृहाला देता येईल. वैधानिक विकास महामंडळाची पुनर्रचना कशी करायची, यामध्ये काय काय करावे लागेल, या सदंर्भात डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालावर चर्चा होत नाही, तोपर्यंत शासन कोणताही निर्णय घेणार नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, वित्त मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली केळकर समितीच्या शिफारसीच्या अनुषंगाने मंत्री गटाची स्थापना करण्यात आली आहे. 23 डिसेंबर, 2014 रोजी केळकर समितीचा अहवाल हिवाळी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला होता. त्यानंतर मंत्री गटाची स्थापना केंव्हा झाली. केळकर समितीच्या शिफारशींच्या बाबतीत मंत्री गटाच्या किती बैठका झाल्या आहेत. डॉ.विजय केळकर यांनी केलेल्या शिफारसीनुसार नाशिक येथे वैधानिक विकास मंडळाचे मुख्यालय स्थलांतरित करण्याच्या संदर्भात निर्णय होणार आहे. केळकर समितीच्या शिफारसीनुसार वैधानिक विकास महामंडळाचे काय भवितव्य राहणार आहे. नाशिक येथे मुख्यालय स्थलांतरित करण्याबाबत शासन काय निर्णय घेणार आहे ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक एक चे उत्तर असे आहे की, 23 डिसेंबर, 2014 रोजी मंत्री गटाची उप समिती स्थापन करण्यात आली. या मंत्रिमंडळाच्या उप समितीची एकही बैठक झाली नाही. याचे कारण असे आहे की, सर्व विभागांची माहिती जोपर्यंत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2822...

श्री.सुधीर मुनगंटीवार....

उप समितीकडे प्राप्त होत नाही तोपर्यंत उप समितीची बैठक घेण्याचे काही कारण नाही. सर्व विभागांची माहिती एकत्रित प्राप्त झाल्यावर त्या माहितीचा अभ्यास करण्यासाठी ही उप समिती निर्माण करण्यात आली आहे. कोणतीही शिफारस करण्यासाठी उप समिती नाही. विभागाकडून आलेली सर्व माहिती एकत्रित करून त्याची छाननी करण्याचे काम उप समिती करणार आहे. नाशिक येथे मुख्यालय स्थलांतरित करण्याचा निर्णय झाला नाही. डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालावर सभागृहात चर्चा होणार आहे. या चर्चेच्या माध्यमातून सर्व आमदारांची मते विचारात घेतली जाणार आहेत, अशी चर्चा होईपर्यंत डॉ.विजय केळकर समितीने केलेल्या शिफारशीच्या संदर्भात कोणताही निर्णय शासन घेणार नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, मंत्री गटाची कोणतीही बैठक आतापर्यंत झाली नाही. सर्व विभागांची माहिती मंत्री गटाकडे यायला पाहिजे ती देखील आलेली नाही. आतापर्यंत फक्त 15 विभागांची माहिती मंत्री गटाकडे आलेली आहे. डिसेंबर महिन्यात अहवाल सभागृहात सादर केल्यानंतर 23 डिसेंबर रोजी मंत्री गटाची स्थापना करण्यात आली आहे. आज एप्रिल महिना उजाडला असून सर्व विभागांची माहिती मंत्री गटाकडे का येऊ शकली नाही, याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी असे सांगू इच्छितो की, यासंदर्भात अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. मंत्री गटाची बैठक घेणे हा महत्वाचा विषय नाही. या अगोदर कागदावर जशा बैठका होत होत्या त्याला काहीही अर्थ नाही....(अडथळा)... आता आपण ऐकून घ्यावे, काय बैठका झाल्या त्याची माहिती मी आपणाला देतो. डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालावर चर्चा करून सर्व सन्माननीय सदस्यांची मते विचारात घेऊन त्यानंतर ॲक्शन टेकन रिपोर्ट तयार करायची सरकारची मानसिकता आहे. या समितीच्या शिफारशीवर चांगल्या प्रकारे अभ्यास करता आला नाही तर त्याचा उपयोग होणार नाही. यापूर्वी दांडेकर समितीपासून अनेक समित्या स्थापन झाल्या व त्यांचे अहवाल आले आहेत. मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश यासंदर्भात 1956 मध्ये करार झाला आहे. 1 मे 1960 रोजी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2822...

श्री.सुधीर मुनगंटीवार....

महाराष्ट्राची स्थापना झाली. त्यावेळी 12 ऑगस्ट रोजी पहिल्या मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात भाषण केले होते. इतके सर्व प्रयत्न करुन देखील प्रादेशिक असमतोल दूर करता आला नाही. उलट असमतोल वाढला आहे. याबाबत आताचे सरकार अतिशय गंभीर आहे. उदासिनतेने राज्य चालविता येणार नाही. विदर्भ, खानदेश, कोकण या सर्व विभागांना शासनाकडून न्याय देण्यात येणार आहे. असा न्याय देताना केळकर समितीच्या अहवालावर चर्चा करुन सर्व सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेऊन सरकार याबाबत मत निश्चित करणार आहे. कोणता सदस्य कोणत्या पक्षाचा आहे, कोण विरोधी पक्षाचा आहे हे सरकारच्या दृष्टीने महत्वाचे नाही. सन्माननीय सदस्यांची मते सरकारसाठी महत्वाची आहेत. सर्व विभागातून आलेली माहिती व सभागृहातील चर्चेतून येणाऱ्या मुद्यांच्या संदर्भात उप समितीकडून या माहितीची छाननी करण्यात येईल, त्यानंतर सर्व समावेशक ॲक्शन टेकन रिपार्ट तयार करण्यात येणार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालाच्या आधारावर हा प्रश्न विचारण्यात आला आहे. हा अहवाल शासनाने मान्य केला नसून सभागृहाने देखील अहवालास मान्यता दिलेली नाही. केळकर समितीच्या शिफारशीबाबत वेगवेगळी मते मतांतरे आहेत, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळे ही घटनेने निर्माण करण्यात आली आहेत. ही महामंडळे कायदेशीर आहेत. याबाबत कोणताही निर्णय घेण्याचा विचार केला तर तो घटनेच्या विरोधात होणार आहे. मुख्यमंत्री महोदयांकडून अनुशेष भरुन निघाला नाही म्हणून तीन वैधानिक विकास महामंडळे स्थापन करण्यात आली होती. आता पुन्हा मुख्यमंत्री महोदयांना अधिकार देण्याचा विचार करण्यात येत आहे. यापूर्वी जे होते ते पुन्हा करायचे आहे काय ? असा महत्वाचा प्रश्न निर्माण होत आहे. घटनात्मक तरतुदीमध्ये बदल करण्याबाबत शासन विचार करीत आहे काय ? राज्यपाल महोदयांना घटनात्मक अधिकार देण्यात आले आहेत. घटनेने अधिकार दिल्यावर तीन वैधानिक विकास महामंडळे स्थापन करण्यात आली आहेत. यात बदल करण्याचा विचार राज्य शासन करीत आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती : डॉ. विजय केळकर समितीच्या अहवालावर उद्या सभागृहात चर्चा होणार आहे. त्यामुळे आताच सर्व प्रश्न उपस्थित करण्याची आवश्यकता नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, या अधिवेशनात डॉ.विजय केळकर यांनी दिलेल्या अहवालावर चर्चा करण्याचे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरले आहे. आतापर्यंत तारीख निश्चित होत नव्हती. उद्या शासनातर्फे याबाबत सभागृहात प्रस्ताव येणार आहे. यावर दोन दिवस चर्चा करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या अहवालावर सभागृहात चर्चा होणार आहे. वैधानिक विकास महामंडळे निर्माण करण्याचा निर्णय सन 1993 मध्ये शासनाने घेतला होता. वित्त मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे राज्याचा विकासाचा असमतोल दूर करण्यासाठी विधिमंडळाचे सर्व अधिकार राज्यपाल महोदयांना देण्याबाबत माननीय श्री.शरद पवार मुख्यमंत्री असताना निर्णय झालेला आहे. गेले काही वर्ष वैधानिक विकास महामंडळांना 100 किंवा 200 कोटी रुपयांचा विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात येत होता. आता ही तरतूद बंद करण्यात आली आहे. डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल स्वीकारणे, त्यावर चर्चा करणे हा भाग वेगळा आहे. दरवर्षी वैधानिक विकास महामंडळासाठी तरतूद करण्यात येत होती. त्या रकमेतून त्या विभागातील छोटी-मोठी कामे करण्यात येत होती. तशा प्रकारच्या निधीची तरतूद अर्थमंत्री महोदय यावर्षी करणार आहेत काय ? केळकर समितीच्या अहवालावर चर्चा होऊन जो निर्णय होईल त्याबाबत मी कोणताही प्रश्न विचारीत नाही. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित विकास महामंडळास 100 कोटी रुपयांचा निधी मिळत होता, तो निधी या वर्षापासून पुन्हा सुरु करण्यात येणार आहे काय ?

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2822.....

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, वैधानिक विकास मंडळांना जो 100 कोटी रुपये विशेष निधी उपलब्ध होत होता तो निधी मागील सरकारने बंद केला होता...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, वित्तमंत्री महोदयांनी या संदर्भात माहिती घ्यावी. कारण, वैधानिक विकास मंडळांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत माननीय राज्यपालांचे निदेश असतात. त्यामुळे तो निधी मागील सरकारने बंद केला असे आपण म्हणू नका. नियोजन विभाग आपल्याकडे आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार बजेटरी वाटप होत असते. एवढेच नाही तर विभागाच्या तरतुदी देखील माननीय राज्यपाल ठरवितात. वैधानिक विकास मंडळाला निधी न देण्याबाबत माननीय राज्यपालांचे निदेश होते. राज्य सरकार या बाबतीत माननीय राज्यपालांना पुन्हा विनंती करणार आहे काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, हे खरे आहे की, माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार विशेष निधी बंद केला जातो. परंतु, ज्यावेळी माननीय राज्यपाल विशेष निधी बंद करण्याच्या संदर्भात निदेश देतात त्यावेळी राज्य सरकार माननीय राज्यपालांना विनंती करु शकते. ज्यावेळी सन 2011-12 मध्ये माननीय राज्यपालांनी निदेश दिले की, विशेष निधी बंद करावा. त्यावेळी मागील सरकारने आपण जो निदेश दिलेला आहे त्याचा फेरविचार व्हावा, असे साधे पत्र देखील माननीय राज्यपालांना पाठविले नाही. सन 2014-15 मध्ये माननीय राज्यपालांनी या संदर्भात मान्यता दिली होती. आपण या संदर्भातील निधी उपलब्धही करुन दिला. आपण यावर्षी देखील अंदाजे 25 कोटी रुपयांच्या जवळपास निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. या संदर्भात वैधानिक विकास मंडळाकडून सूचना आलेल्या आहेत. आम्ही या संदर्भात माननीय राज्यपालांना देखील विनंती करीत आहोत. खर्चाच्या बाबतीत नाही. पैसे द्यावयास सुरुवात झाली. परंतु, वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून हा निधी खर्च करताना मागील वर्षी जे निकष लावले त्या निकषानुसार तो निधी खर्च करण्यासाठी अडचणी येत आहेत. आपण याकरिता माननीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2822.....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

राज्यपालांना विनंती करणार आहोत आणि सर्व वैधानिक विकास मंडळांची एक बैठक घेऊन या निकषामध्ये जर फेरबदल केला तर आपण जो निधी उपलब्ध करुन देतो तो निधी खर्च होईल. कारण, मागील वर्षी या संदर्भातील निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर देखील तो खर्च होऊ शकला नाही. श्री.तटकरे साहेब, खरे तर हा या प्रश्नाचा भाग नाही. तरी देखील मी सांगू इच्छितो की, वैधानिक विकास मंडळ आणि त्या क्षेत्राच्या विकासासाठी हे सरकार कटिबद्ध आहे. प्रत्येक विभागाचा समतोल विकास व्हावा हे लक्ष सरकार समोर आहे आणि या लक्षापर्यंत पोहोचेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही. श्री.तटकरे साहेब, आम्ही पूर्ण शक्तीनिशी या लक्षापर्यंत पोहोचू. वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून खर्च होणारा निधी अर्थमंत्री म्हणून मी निश्चितपणे उपलब्ध करुन देईन. कारण, एक प्रश्न म्हणून नव्हे तर तुम्ही जी मागणी केली ती मागणी पूर्ण करणे माझे कर्तव्य आहे. आपण वैधानिक विकास मंडळांना निधी उपलब्ध करुन देऊ.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उमरी ते वसंतनगर पादंण (ता.मानोरा, जि.वाशिम) या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे झालेले काम

(६) * **३३३१ *श्री.हरिसिंग* राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी ते वसंतनगर पादंण (ता.मानोरा, जि.वाशिम) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी मग्रारोहयो अंतर्गत उमरी खुर्द ते वसंतनगर कामाचे बिल (देयक) काढणाऱ्या शाखा अभियंता यांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम करणा-या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

श्रीमती पंकजा मुंडे :
(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, जिल्हा वाशिम, ता.मानोरा येथील उमरी ते वसंतनगर पांदन रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे, या संदर्भात मी लेखी प्रश्न विचारला होता. मी नेहमीच या रस्त्यावरुन ये-जा करीत असतो. एक जबाबदार सन्माननीय सदस्य म्हणून मी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. माननीय ग्राम विकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे श्रीराम नवमीच्या दिवशी त्या भागात गेल्या होत्या. तुम्ही परवा या रस्त्याने प्रवास केल्यामुळे कदाचित हे आपल्याही लक्षात आले असेल. या तारांकित प्रश्नाला "हे खरे नाही, प्रश्न उद्‌भवत नाही," असे उत्तर दिलेले आहे. तारांकित प्रश्नाचे लेखी उत्तर देताना संबंधित अधिकाऱ्यांनी थोडी तरी माहिती उपलब्ध करुन दिली पाहिजे. माझा प्रश्न असा आहे की, या रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक किती होते, या कामाचे बिल अदा करण्यात आलेले आहे काय आणि संबंधित अभियंत्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3331.....

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, उमरी ते वसंतनगर या पांदन रस्त्याचे काम महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत करण्यात आलेले आहे. हे काम अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. त्यामुळे हे काम निकृष्ट दर्जाचे होत आहे हे आम्ही उत्तरात नाकारले आहे. मी सांगू इच्छिते की, या कामाला दिनांक 10 जुलै, 2013 रोजी तांत्रिक मान्यता देण्यात आली, दिनांक 1 फेब्रुवारी, 2014 रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आणि कार्यरंभ आदेश दिनांक 5 फेब्रुवारी, 2014 रोजी देण्यात आलेला आहे. दिनांक 2 फेब्रुवारी, 2014 रोजी हे काम सुरु झालेले आहे. या रस्त्याची एकूण लांबी 1,050 मीटर इतकी आहे. या कामाचे एकूण बजेट 18,23,384/- रुपये इतके आहे. त्यापैकी कुशल काम 10,45,068/- रुपयांचे आणि अकुशल काम 5,83,442/- रुपयांचे आहे. आता पर्यंत या कामावर कुशल आणि अकुशल असा एकूण 10,88,099/- रुपये खर्च झालेला आहे. हे काम अद्याप पूर्ण व्हावयाचे आहे. हे काम चांगल्या दर्जाचे होईल, निकृष्ट दर्जाचे होणार नाही, अशी खात्री सन्माननीय सदस्यांनी बाळगावी. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मी पोहरादेवी येथे जाताना या रस्त्यावरून प्रवास केलेला आहे. अधिकारी वर्गाने या कामाची पूर्णपणे चौकशी केलेली आहे आणि हे काम चांगल्या दर्जाचे होईल, अशी मी सभागृहाला खात्री देते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

माळशेज घाटातील अभयारण्याच्या हद्दीत सुरु असलेली बेकायदेशीर दगडखाण व डांबर प्लाण्टबाबत

(७) * **४२११ *श्री.माणिकराव* ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ *शिंदे :* सन्माननीय वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय वन कायद्यानुसार अभयारण्य व वनखात्याच्या राखीव जंगलानजीक दगडखाण, गौणखनिज उत्खनन करता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटाच्या पायथ्याशी अभयारण्याच्या हद्दीत झाडघर येथे मागील काही वर्षा पासून बेकायदेशीर दगडखाण सुरु असून वनखात्याचे या गंभीर गोष्टीस अभय असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी उपवनसंरक्षक, ठाणे, प्रधान सचिव, वनविभाग, मा.वनेमंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे आदींकडे माहे नोव्हेंबर, २०१४ पूर्वी मागील १ वर्षापासून सातत्याने केलेल्या तक्रारीततस्पष्टपणे म्हटले आहे, हेही खरे आहे काय,
(३) माळशेज घाटात अभयारण्याच्या हद्दीतच झाडघर गावात दगडखाण व डांबर प्लाण्ट उल्हासनगर येथील ठेकेदाराने आदिवासी इसमाच्या नावाने सुरु केल्यामुळे या दगडखाणींच्या सुरुंग स्फोटामुळे ववडांबर प्लाण्टच्या प्रदूषणामुळे वन्य प्राण्यांचे जीवनच धोक्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू अभयारण्य हद्दीत सुरु असलेली बेकायदेशीर दगडखाण व डांबर प्लाण्टच्या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) अभयारण्य व वनखात्याचे राखीव जंगलामध्ये केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय दगडखाण, गौणखनिज उत्खनन करता येत नाही. तसेच अभयारण्य क्षेत्राच्या बाह्यहद्दी पासून १० कि.मी. अंतरापर्यंतच्या (Eco ***Sensitive Zone)*** क्षेत्रातील खाणकाम / उत्खननाच्या प्रस्तावास जर पर्यावरण विभागाची मंजूरी आवश्यक असेल तर राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची विधीवत परवानगी घेणे देखील बंधनकारक आहे.
(२) सदर विषयाबाबत दैनिक सामना वृत्तपत्रात दिनांक २.१२.२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, न्याहाडी यांचेमार्फत केलेल्या चौकशीमध्ये असे आढळून आले की, मौजे झाडघर, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील सर्व्हे नं. १४३ / ५ वरील ३.४५ हेक्टर आर क्षेत्रावर दगडखाण काढलेली होती. परंतु सद्य:स्थितीत तेथे कोणतेही उत्खनन चालू नसून उत्खननाचा साठादेखील आढळून आलेला नाही.
(३) मौजे झाडघर येथील सदरच्या दगडखाणीचे क्षेत्र भिमाशंकर अभयारण्य व हरिश्चंद्रगड-कळसूबाई अभयारण्याच्या संरक्षित क्षेत्राच्या सीमेपासून १० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर आहे, त्यामुळे वन्य प्राण्यांचे जीवन धोक्यात आलेले आहे, हे खरे नाही.
(४) प्राप्त तक्रारीबाबत चौकशी करण्यात आली आहे.
(५) चौकशीमध्ये सदर दगडखाणीचे क्षेत्र भिमाशंकर अभयारण्य व हरिश्चंद्रगड-कळसूबाई अभयारण्याच्या संरक्षित क्षेत्राच्या सीमेपासून १० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असल्याचे व सदर दगडखाणीकरिता महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांच्याकडून ***Environmental Clearance*** मिळाल्याचे आढळून आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4211.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटाच्या पायथ्याशी अभयारण्याच्या हद्दीत झाडघर येथे मागील काही वर्षापासून बेकायदेशीर दगडखाण सुरु आहे. बेकायदा दगडखाणीच्या संदर्भात स्थानिक ग्रामस्थांनी उप वन संरक्षक ठाणे, प्रधान सचिव, वन विभाग, माननीय वनेमंत्री आणि जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे तक्रार नोंदविली होती. या संदर्भात ते ग्रामस्थ मागील 1 वर्षापासून सातत्याने तक्रार नोंदवित आहेत. त्यांनी तक्रारीमध्ये कोणते मुद्दे उपस्थित केले होते ? तसेच, ही दगडखाण तक्रार आल्यामुळे बंद करण्यात आली, त्यामध्ये काही उणीव आढल्यामुळे बंद करण्यात आली, का त्यांनी स्वत:हून बंद केलेली आहे ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, हा प्रश्न एका दैनिकामध्ये छापून आलेल्या बातमीच्या आधारे उपस्थित करण्यात आलेला आहे. विभागाकडे या संदर्भातील कोणतीही तक्रार उपलब्ध नाही. मध्यंतरी ही जागा वन विभागाची नाही, 10 किलो मीटरच्या बाहेर.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, दैनिकामध्ये छापून आलेल्या बातमीच्या आधारावरुन हा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला नाही. या संदर्भात ग्रामस्थांनी तक्रार केली होती. माझ्याकडे देखील तशा प्रकारची तक्रार आलेली आहे. त्यांनी तिन्ही विभागांकडे तक्रार दिलेली आहे. आपल्याकडे देखील ती तक्रार असावयास पाहिजे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडे या संदभातील तक्रार असेल तर त्यांनी ती उपलब्ध करुन द्यावी. सन 2006 ते 2012 या कालावधीत या दगडखाणीला परवानगी देण्यात आली होती आणि या कालावधीत 900 ब्रास दगड काढण्यात आलेला आहे. तसेच, 1 लाख 525 रुपये रॉयल्टी महसूल विभागाकडे भरण्यात आलेली आहे. ज्यावेळी केंद्र शासनाने सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार काही निर्णय केले त्यावेळी सन 2013 मध्ये पर्यावरण विभागाने या दगडखाणीसाठी परवानगी दिली होती. परंतु, नंतर या दगडखाणीतून दगड काढण्यात आलेले नाहीत. सन्माननीय सदस्यांकडे या संदर्भात अधिकची माहिती असेल तर त्यांनी ती माझ्याकडे द्यावी. मी सांगू इच्छितो की, ही दगडखाण वन विभागाच्या जागेवर नाही, ही दगडखाण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4211.....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

वन विभागाच्या इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये नाही. श्री.माणिकराव ठाकरे साहेब, आपले सरकार सत्तेवर असताना महसूल विभागाच्या परवानगीने सन 2006 ते 2012 या कालावधीत ही दगडखाण सुरु होती.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, तुमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर आहे म्हणून हा प्रश्न विचारण्यात आला असे नाही...

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीची प्रत सन्माननीय सदस्यांकडे असेल आणि त्यांनी ती प्रत माझ्याकडे दिली तर मी पुन्हा एकदा याची चौकशी लावतो. परंतु, आता चौकशीतून असे निष्पन्न झालेले आहे की, ही दगडखाण वन विभागाच्या जागेवर नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, पुन्हा चौकशी केली जाईल.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4211....

श्री.सुधीर मुनगंटीवार : शासनाकडे ग्रामस्थांची तक्रार आलेली नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी.

श्री.सुधीर मुनगंटीवार : माहिती घेतली असून ग्रामस्थांची तक्रार आलेली नाही. दैनिकामध्ये बातमी छापून आल्यानंतर शासनाने माहिती घेतली. सन्माननीय सदस्यांनी तक्रार उपलब्ध करुन दिली आणि त्या तक्रारीमध्ये स्पेसिफिक मुद्दा असेल तर शासनाच्या वतीने चौकशी केली जाईल. वन विभागाच्या जागेवर माईन्स नाही. इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये माईन्स नाही, बफर झोनमध्ये नाही, कोअर झोनमध्ये नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला हवे तसे उत्तर देऊन शासनाला मोकळे होता येणार नाही. तक्रार असेल तर ती दिल्यानंतर उत्तर देऊ असे म्हणता येणार नाही. या विषयाबाबत तक्रार केलेली आहे. शासनाने पुन्हा माहिती घ्यावी. जर अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई करणार आहात काय?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे पुन्हा तक्रार दिली असेल तर त्याचा शोध घेतला जाईल आणि प्रश्नाचे उत्तर देताना विभागाच्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल, माहिती लपविण्याचा प्रयत्न केला असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. माझ्याकडे जमिनीचा 7/12 सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, या विभागामध्ये वन जमिनीवर सातत्याने माईन्स सुरु असल्याबाबतचा विषय चर्चेला येत असतो. त्यामुळे या भागाचे जीपीएस प्रणालीद्वारे चित्रण करुन वन विभागाची जागा मार्क केली जाईल काय?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. माननीय सदस्यांना निश्चितपणे सांगू इच्छितो की, वन क्षेत्राची सीमा सुरक्षित करणे, वन क्षेत्राचे संवर्धन करणे, विकास करणे याला शासनाचे प्राधान्य आहे. याचे कारण असे की, आम्ही स्वतः अनुभव घेत आहोत. क्लायमेट चेंज, ग्लोबल वार्मिंग हे शब्द कधी ऐकले नव्हते. गेल्या एक वर्षात 7500 कोटी रुपयांपेक्षा अधिक आर्थिक मदत द्यावी लागली. भविष्यात असे घडू नये या दृष्टीने शासन गंभीर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4211....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

आहे. सीमांकन असेल किंवा अशा प्रकारच्या खाणी विनापरवाना सुरु असतील तर त्याबाबत नियम केलेले आहेत. खनिज संपत्ती घेऊन जाणारे वाहन सापडले तर ते सरकारजमा केले जाते. नंतर स्वीकृतनाम्यावर सोडता येते. आपल्या जिल्हयामध्ये गेल्या वर्षभरात 14 वाहने सरकारजमा झाली आहेत. ती स्वीकृतनाम्यावर सोडलेली नाहीत.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील काळु धरणाला परवानगी मिळण्यासाठी ८ ग्रामसभांचे जोडलेले बनावट ठराव

(८) * **४७३३ *श्री.हेमंत* टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील काळु धरणाला परवानगी मिळण्यासाठी ८ ग्रामपंचायतीच्या ग्रामसभांचे बनावट ठराव जोडले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात काही सामाजिक संघटनांच्यावतीने टोकावडे पोलीस ठाण्यात दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारासस तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय
(४)असल्यास, त्यात काय निदर्शनास आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ***?***
***श्री.विजय शिवतारे,* श्री. गिरीष महाजन *यांच्याकरिता* :** (१) व (२) श्रमिक मुक्ती संघटनेच्या वतीने दिनांक २३/५/२०१३, २८/१२/२०१४ व दिनांक १/१/२०१५ रोजी पोलीस स्टेशन, टोकावडे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(३) उक्त प्रकरणी टोकावडे पोलीस ठाणे मार्फत तपास चालू आहे.
(४) तपासणी अद्यापी पूर्ण झालेली नाही. त्यामुळे संबंधीतावर कार्यवाहीचा प्रश्न उद्भवला नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, टोकावडे पोलीस ठाणे येथे 8 डिसेंबर, 214 रोजी तक्रार करण्यात आल्याचे उत्तरात नमूद केले आहे. मूळ प्रश्नाप्रमाणे 8 ग्रामपंचायतीच्या ग्रामसभांचे बनावट ठराव जोडल्याचे निदर्शनास आले, त्या संदर्भात संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, श्रमिक मुक्ती संघटनेच्या वतीने तक्रार करण्यात आल्यानंतर पोलीस ठाण्याने ती तक्रार रजिस्टर केलेली आहे. ती तक्रार खरी आहे की खोटी आहे याचा तपास झाला पाहिजे. तपास पूर्ण झाल्यानंतर ती तक्रार खरी होती का खोटी याच्या निष्कर्षाप्रत येऊ शकतो.

श्री.हेमंत टकले : चौकशी केव्हा पूर्ण होईल आणि त्यावरील कारवाई केव्हा केली जाईल?

श्री.विजय शिवतारे : ही चौकशी पोलीस विभाग करीत आहे. त्याची माहिती विभागाला दिली जात आहे. ठराव बनावट होता की नाही याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. आतापर्यंत 22 साक्षीदार तपासले गेले आहेत. अद्याप तपास पूर्ण झालेला नाही. पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांच्याकडून उत्तर आल्यानंतर अधिक विवेचन करता येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) F.4

SGB/ 13:50

चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत १५० प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

(९) * **५१४२ *श्रीमती* शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत १५० प्राथमिक शिक्षक वरिष्ठ वेतनश्रेणी पासून वंचित असल्याने महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समितीने शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी लागु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

श्री.दीपक केसरकर, श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे.
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे आदेश दिनांक ३०.८.२०१४ अन्वये ३१५ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केलेली आहे. तसेच वरिष्ठ वेतनश्रेणीपासून वंचित असलेल्या उर्वरित प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, उर्वरित 315 शिक्षकांना वेतनश्रेणी लागू केली आहे. इतर शिक्षकांना ती वेतनश्रेणी अद्याप लागू केलेली नाही. ही कार्यवाही केव्हा पूर्ण होईल आणि त्या शिक्षकांना वेतनश्रेणी केव्हा लागू केली जाईल?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, कार्यवाही एका महिन्याच्या आत पूर्ण केली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

परळी (जि.बीड) येथील शिशुगृहातील बालके गायब झाल्याबाबत

(१०) * **५२२७ *श्री.धनंजय* मुंडे, श्री.सुनील तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतीश चव्हाण :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व.नेमीचंद दीपकचंद बहेरा शिशुगृह परळी (जि.बीड) येथे दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास बालकल्याण समितीच्या सदस्यांनी भेट दिली असता सहा बालके गायब असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिशुगृहातील सहा बालके संशयास्पदरितीने गायब झाल्याप्रकरणी शासकीय अधिकारी अथवा संस्थेने रितसर तक्रार नोंदविलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या बाल कल्याण विभागातील अधिकारी व शिशुगृह चालक यांच्या संगनमताने हा प्रकार घडला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणातील संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) महाराष्ट्र मारवाडी फाऊंडेशन संचलित स्व.नेमीचंद बडेरा, शिशुगृह, परळी जि.बीड या संस्थेतील ६ बालके बाल कल्याण समितीने दत्तकासाठी मुक्त केलेली नसताना दत्तकेच्छुक पालकांना सांभाळण्यासाठी दिलेली होती.

(२) हे खरे नाही.

बाल कल्याण समिती, बीड यांनी संस्थेचे संचालक, अधीक्षक यांचेविरुध्द पोलीस स्टेशन परळी येथे भा.दं.वि. कलम ३६३ नुसार फिर्याद दिलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) संस्थेस देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र रद्द का करण्यात येऊ नये, अशा आशयाची संस्थेस आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय कार्यालयाकडून कारणे दाखवा नोटिस बजाविण्यात आलेली आहे. संस्थेचा खुलासा प्राप्त होताच नियमानुसार संस्थेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र मारवाडी फाऊंडेशन संचलित स्व.नेमीचंद बहेरा शिशुगृह या संस्थेकडे बालक दत्तक देण्याचा परवाना नसतानाही नियमबाह्यरित्या बालके दत्तक दिल्याची बाब समोर आली आहे. उत्तरात नमूद केले आहे की, भा.दं.वि.कलम 363 अन्वये संस्थेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. बालक दत्तक देण्याचा परवाना संपलेला असताना गेली दोन वर्षे बालके दत्तक दिली जात आहेत, याकडे दुर्लक्ष करणाऱ्या जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांना निलंबित केले जाईल काय? केवळ संस्थेच्या अधीक्षकांवर गुन्हा दाखल केला आहे. संस्थेचे सदस्य सचिव यांच्याविरुध्द गुन्हा नोंद होणे आवश्यक आहे. या बालकांना आम्हाला दत्तक द्यायचे आहे असे संस्थेने महिला व बालविकास विभागाला कळवूनही त्यांना परवाना देण्याबाबत दिरंगाई झाली म्हणून हा प्रकार घडला हे खरे आहे काय?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र मारवाडी फाऊंडेशनतर्फे चालविल्या जाणाऱ्या नेमीचंद दीपकचंद बडेरा शिशुगृह या संस्थेमार्फत नियमबाह्य पध्दतीने बालके दत्तक दिली गेली हे उत्तरात नमूद केले आहे. याकरिता महिला व बालकल्याण समितीची मान्यता घ्यावी लागते, ती मान्यता या संस्थेने घेतलेली नाही. बालकल्याण समिती, बीड यांना अवगत न करता कारभार झाला. म्हणून भा.दं.वि.कलम 363 नुसार फिर्याद देण्यात आली आहे. त्यामुळे महिला व बालविकास अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द का करु नये अशी नोटीस संस्थेला देण्यात आली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरु असून अहवाल आल्यानंतर संबंधितांविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या संस्थेचे अध्यक्ष आणि सचिव कोण आहेत? संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द का करण्यात येऊ नये अशी नोटीस संस्थेला देण्यात आली आहे, त्याची तारीख काय आहे आणि संस्थेला उत्तर देण्यासाठी किती कालावधी देण्यात आला आहे?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, या संस्थेच्या अध्यक्षांचे नाव आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हा प्रश्न 40 दिवस अगोदर विचारला आहे. संस्थेच्या प्रमुखांचे नाव माहित नाही असे कसे म्हणता येईल, नावे लपविण्याचा प्रयत्न होत आहे का?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, माननीय सदस्यांना असा आरोप करता येणार नाही. संस्थेकडून अनियमितता झाल्याचे शासनाने कबूल केले आहे. या संस्थेच्या कार्यकारिणी मंडळावरील सर्व लोकांच्या नावाची यादी पटलावर ठेवण्यात येईल. त्यांची नावे लपविण्याचा प्रश्न येत नाही. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होणार आहे.....(गोंधळ)..... सभापती महोदय, या संस्थेचे अध्यक्ष श्री.जयप्रकाश मुंदडा व सचिव श्री.विरेंद्र धोक हे आहेत. चौकशीबाबत शासन सकारात्मक असून त्यांच्याविरुध्द ॲक्शन घेण्यासाठी तयार आहोत. लहान मुलांबाबत कोणताही चुकीचा निर्णय घेतल्यास तो सहन केला जाणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर जी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.5227...

श्रीमती पंकजा मुंडे...

त्यामुळे आम्ही यात कोणतीही गोष्ट नाकबूल करीत नाही. यासंबंधातील अहवाल एक महिन्यामध्ये प्राप्त झाल्यानंतर त्यावर पूर्णपणे निर्णय घेण्यात येईल.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनासंबंधी

उप सभापती : माझ्याकडे नियम 289 अन्वयेची पहिली सूचना सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांची आलेली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, केंद्र सरकारने अलीकडेच अध्यादेश जारी करून भूसंपादनात मोठे बदल केलेले असणे, आधीच्या सरकारने शेतकऱ्यांच्या हिताच्या केलेल्या तरतुदी बदलून नव्या कायद्यात उद्योगांना झुकते माप देण्यात येणे, ज्या अर्थी .....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ...

उप सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, आपण ज्येष्ठ सदस्य आहात. माझ्याकडे ज्या क्रमाने सूचना आल्या आहेत त्या मी वाचत आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, तो आपला अधिकार आहे. त्यासंबंधी मी बोलणार नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना कोणी कोणी दिल्या आहेत व त्यांचा विषय काय आहे हे आपण सदनाला अवगत करून दिले पाहिजे. मग त्यावर आम्हाला भाष्य करता येईल. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेतील विषय एकच असेल तर तशी सूचना कोणी कोणी दिली आहे हे सदनाला समजले पाहिजे. मी माझी सूचना किती वाजता दिली होती हे मला माहीत आहे.

उप सभापती : मग आता हा क्रम देखील पटलावर ठेवावा लागेल. मी सचिवांना सांगू इच्छितो की, त्यांनी यापुढे सभागृहात येण्यापूर्वीच कोणाची कोणत्या विषयातील सूचना किती वाजता आली ही बाब फ्लॅश करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझी सूचना पहिली असल्याची बाब सचिवांनीच माझ्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांची दिनांक 6 एप्रिल 2015 रोजीची नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना सकाळी 9 वाजून 35 मिनिटांनी मला प्राप्त झालेली आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी आपली सूचना मांडावी. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महादेय, हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे, गंभीर आहे. केवळ आपल्या राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात जमीन अधिग्रहण कायद्यासंबंधी एक प्रकारे आंदोलनाची भूमिका घेऊन नागरिक रस्त्यावर आलेले आहेत. एसईझेड, औद्योगिक कॉरिडॉर या प्रकल्पांसाठी जमीन घ्यावयाची झाल्यास प्रकल्पग्रस्तांपैकी 70 टक्के शेतकऱ्यांनी होकार दिल्याशिवाय जमीन ताब्यात घेण्याची तरतूद जुन्या कायद्यात होती परंतु, ती आता नवीन कायद्यात नाही. शासनाने आता वटहुकूम काढल्यामुळे जनतेमध्ये तीव्र पडसाद उमटले आहेत. अधिवेशन सुरू झाल्यापासून दुष्काळ, पाणी टंचाई, गारपीट, अवकाळी पाऊस या विषयांकडे लक्ष देत असताना मुळात शेतकऱ्यांकडे ज्या जमिनी आहेत त्या काढून घेण्याचा डाव रचला जात असेल तर या विषयावर सभागृहात चर्चा करण्याची नितांत आवश्यकता आहे. हा विषय तातडीचा असल्यामुळे आजचे सभागृहासमोर असणारे सर्व कामकाज बाजूला ठेवून चर्चा घ्यावी अशी मी विनंती करीत आहे.

उप सभापती : या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तेव्हा यासंबंधी शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने वटहुकूम काढला आहे. त्यामुळे ही बाब गंभीर आहे. अधिवेशन सुरू असताना कायद्याने वटहुकूम काढता येत नाही. असे असताना शेतकऱ्यांवर अन्याय करणारा जो वटहुकूम काढलेला आहे तो ताबडतोब रद्द करावा. तो वटहुकूम बेकायदेशीर आहे. तो वटहुकूम कायदेशीर होत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेचे मी समर्थन करतो, पाठिंबा देतो आणि सभागृहापुढील आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करावी अशी मी मागणी करीत आहे.

उप सभापती : यासंबंधी मी माननीय सभापतींशी चर्चा करून या विषयासंबंधी वेगळी चर्चा देण्याचा प्रयत्न करतो.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, 13 मार्च रोजी शासनाने वटहुकूम काढला आहे. आता आपले अधिवेशन सुरू आहे. यासंबंधातील निवेदन देखील सरकारने अद्याप पर्यंत केलेले नाही. अधिवेशन सुरूअसताना.....

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी यातील वास्तव सदनाच्या निदर्शनास आणून देत आहे. सन्माननीय सदस्यांना आपण जागेवर बसण्यास सांगावे.

..... (गोंधळ).....

सभापती महोदय, वटहुकूम काढलेला नसून अधिसूचना काढण्यात आलेली आहे. अधिसूचना आणि अध्यादेश यामध्ये फरक आहे. सन्माननीय सदस्य मुद्दामहून गोंधळ घालत आहेत. ते सभागृहासमोर चुकीचे म्हणणे मांडत आहेत.

..... (गोंधळ).....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आताच मंत्री महोदयांनी सांगितले की, वटहुकूम काढलेला नसून अधिसूचना काढलेली आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे बोलत आहेत. सभागृहात शांतता राखावी.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देताना वटहुकूम काढलेला नसून अधिसूचना काढली आहे असे सागितले आहे. राज्य शासनाला अधिवेशनच्या कालावधीत अधिसूचना काढण्याचा अधिकार नाही. केंद्र सरकारने हा कायदा अद्यापि पारित केलेला नसताना देखील सदनाला विश्वासात न घेता शेतकऱ्यांवर नांगर फिरविणाऱ्या सरकारचा आम्ही निषेध करतो. अधिवेश काळात सरकारला अधिसूचना काढण्याचा अधिकार नाही. केंद्र शासनाने अजूनही हे विधेयक पारित केलेले नाही. ही अधिसूचना बेकायदेशीर आहे. ती शासनाने तातडीने मागे घेणे आवश्यक आहे. त्यामुळे यासंबंधी सदनात तातडीने चर्चा होणे आवश्यक आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देतात.)

उप सभापती : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज करणे मला शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 2.15 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.07 ते 2.15 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे. सन्माननीय सदस्यांना जे काही बोलावयाचे असेल ते आपल्या आसनावर जाऊन बोलावे. तुम्ही माझे म्हणणे ऐकणार नसाल तर मला नाईलाजाने पुढील कामकाज पुकारावे लागेल.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्य सभेत भूसंपादन कायदा अद्याप पारीत व्हावयाचा आहे. केंद्र सरकारने भूसंपादन कायदा पारीत केलेला नसताना या बिलाच्या संदर्भात अधिसूचना काढण्याची घाई या राज्यसरकारला का झाली आहे ? मुंबईमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. दि. 13 मार्च, 2015 रोजी राज्य सरकारने यासंदर्भात अधिसूचना काढली असून 13 मार्च, 2015 रोजी महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिवेशन देखील सुरु होते. अधिवेशन सुरु असताना अधिसूचनेच्यासंदर्भात सभागृहात निवेदन का केले गेले नाही ? आता शेतकऱ्यांना कोणीही वाली राहिलेला नाही.

उप सभापती : विरोधी पक्ष नेते काय बोलत आहेत ते आपल्या गोंधळामुळे ऐकू येत नाही.

श्री. धनंजय मुंडे : या विधेयकाच्या संदर्भात संपूर्ण देश पेटलेला आहे. आम्ही ग्रामीण भागात फिरत असतांना शेतकरी आम्हाला सुध्दा धरायला लागले आहेत. विधिमंडळात आम्ही कोणत्या पक्षाचे सदस्य आहोत ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना माहिती नाही. या भूसंपादन कायद्यामुळे आमच्या जमिनी आम्हाला न विचारता घेतल्या जातील अशी शेतकऱ्यांच्या मनात भिती निर्माण झाली आहे. या विधेयकाच्या संदर्भात राज्य सरकारला एवढी घाई का झाली आहे ? राज्य सभेत अजून हा कायदा पारीत व्हावयाचा आहे. अध्यादेश 1 एप्रिल किंवा 5 एप्रिल रोजी.....या बिलाच्या संदर्भात राज्य सरकारला भिती वाटल्यामुळे त्यांनी या बिलाच्या संदर्भात ऑर्डिनन्स काढला आहे. या भूसंपादन कायद्याच्या संदर्भात देशातील कोणत्याही राज्याने एवढी घाई केली नाही एवढी घाई या राज्य सरकारने केलेली आहे.

उप सभापती : आता सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आपले विचार मांडतील.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या विरोधात नवीन कायदा आणण्याच्या संदर्भात प्रयत्न चालविले आहेत त्यास देशातील शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध होत आहे. हे विधेयक लोकसभा आणि राज्यसभेमध्ये पारित झालेले नाही. या विधेयकास दोन्ही सदनामध्ये विरोध झालेला आहे. केंद्रात काँग्रेस पक्षाचे सरकार असताना हे विधेयक बनविणाऱ्या समितीमध्ये भाजपाचे देखील खासदार होते. त्यावेळी त्यांनी देखील शेतकऱ्यांच्या बाजूचे विधेयक असावे यासाठी समर्थन दिले होते. आता नवीन सरकार आल्यानंतर या विधेयकामध्ये संपूर्ण बदल करण्यात आला आहे आणि हे विधेयक मंजूर होत नाही असे समजल्यावर त्या संदर्भात अध्यादेश काढण्यात आला. शेतकऱ्यांच्या जमिनी 70 टक्के जमीन शासकीय कामाकरिता आणि 80 टक्के जमीन खाजगी कामाकरिता घेण्यात येतील, परंतु ते शेतकऱ्यांना मान्य असेल तरच त्यांच्या जमिनी संपादित करण्यात येईल अशी महत्वपूर्ण तरतूद त्यावेळी करण्यात आली होती. तसेच शेतकऱ्यांची जमीन त्याच कामाकरिता वापरली नाही तर ती त्यांना परत देण्याची देखील तरतूद होती.. (अडथळा) ..

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कोणत्या नियमाखाली बोलत आहेत ?

उप सभापती : हा प्रश्न अत्यंत गंभीर आणि महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य काय बोलत आहेत हे मला जाणून घ्यायचे आहे. मी आपणास बोलण्याची परवानगी देईन त्यावेळी आपण बोलावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,शेतकऱ्यांच्या जमिनीला चौपट किंमत मिळावी तसेच 15 टक्के विकसित जमीन मिळावी अशाप्रकारचे विधेयक तत्कालीन काँग्रेस पक्षाने आणले होते. आम्ही शेतकऱ्यांच्या हिताचे विधेयक आणले होते. दिल्ली ते मुंबई कॉरीडॉरसाठी शेतकऱ्यांची लाखो एकर जमीन लागणार आहे. असे एकूण तीन कॉरीडॉर येणार आहेत. परंतु माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी देशात 19 कॉरीडॉर करण्याचे ठरविले आहे. हे सरकार शेतकऱ्यांच्या जमिनी हिसकावून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. देशातील शेतकऱ्यांना अंधारात ठेवण्यात येत आहे. या संदर्भात वर्तमानपत्रात लेख आले आहेत, विविध चॅनेल्सवर चर्चा होत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे..

आहेत. झी चॅनेलवर देखील चर्चा झालेली आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून देण्याचे काम या अध्यादेशाद्वारे करण्यात येत आहे. सदनाला काही कळू नये म्हणून रातोरात अध्यादेश काढण्यात आलेला आहे. या संदर्भातील ठराव सभागृहात आणून त्यावर चर्चा घडवून आणली पाहिजे. हा अध्यादेश नाकारावा अशी आमची सर्वांची मागणी आहे. या अध्यादेशाला मान्यता देऊ नये. या अध्यादेशाला आमचा एकमुखाने विरोध आहे.

उप सभापती : या विषयावर आपल्या सर्वांच्या भावना तीव्र आहेत. हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. माननीय सभापती दुपारी येणार आहेत, त्यांच्याशी मी चर्चा करतो. या विषया संदर्भात माननीय सभापती तसेच गट नेत्यांशी एकत्रित चर्चा करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,...

उप सभापती : आपण कृपया खाली बसावे. मी देखील शेतकरी आहे. या सर्व गोष्टींची मला देखील कल्पना आहे. हा अत्यंत महत्वाचा व गंभीर प्रश्न आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना देखील त्याची जाणीव आहे. या विषया संदर्भात मला माननीय सभापतींशी बोलावे लागेल. आपण हा विषय तातडीने चर्चेला घेऊ.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जमीन अधिग्रहण कायद्या संदर्भात सभागृहात चर्चा करण्याची आमची देखील इच्छा आहे. सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव येईल त्यावेळी चर्चा करू शेतकऱ्यांना कोण लुटणारे आहेत आणिशेतकऱ्यांच्या बाजूने कोण आहेत हे आम्हाला उघडे पाडायचे आहे. आम्ही खुल्या चर्चेला तयार आहोत. (अडथळा)..

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय...

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

उप सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया खाली बसावे. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना मी पाच मिनिटे बोलण्याची परवानगी देत आहे. त्यांच्या भाषणात कोणीही आक्षेप घेऊ नये. त्यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे बोलतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. माननीय विरोधी पक्ष नेते तसेच ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी येथे जी चर्चा उपस्थित केली त्यातील वास्तव काय आहे सांगण्याची सरकारलाही उत्सुकता आहे. माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे की, अधिवेशन काळात अधिसूचना काढता येते की नाही ? सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे वारंवार अध्यादेश असा उल्लेख करीत आहेत. ते ज्येष्ठ सदस्य आहेत. अध्यादेश असा उल्लेख ते चुकून करीत असतील असे मी समजतो. त्यांना अध्यादेश आणि अधिसूचनेतील फरक माहीत असेल. अधिवेशन काळात अधिसूचना काढता येते की नाही याची आपण मला माहिती द्यावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विषया संदर्भात नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे समजण्यासाठी त्यावर चर्चा झाली पाहिजे. कारण विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. शिवसेना पक्षाच्या भूमिकेनुसार आम्ही केंद्र सरकारकडे या कायद्याच्या संदर्भात मतभेद व्यक्त केलेले आहेत. दिनांक 10 एप्रिल रोजी अधिवेशन संपणार आहे. शिवेसनाश्रेष्ठी मा.श्री.उद्धव ठाकरे यांच्याशी मी चर्चा केलेली आहे. मी सदनामध्ये माझ्या पक्षाची भूमिका मांडत आहे. या अधिसूचनेवर सभागृहात चर्चा झाली पाहिजे असे आमचे मत आहे. नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेला आमचे समर्थन नसले तरी या कायद्या संदर्भात सभागृहात चर्चा व्हावी अशी आमची इच्छा आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 289 अन्वये सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर सभागृहात चर्चा घ्यावी अशा प्रकारची मागणी विरोधी पक्षाकाडून होत आहे. माननीय मानव संसाधान विकास मंत्र्यांनी या ठिकाणी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. त्यांनी सांगितले की, हा अध्यादेश नसून अधिसूचना आहे. परंतु ती अधिसूचना शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधातील आहे. वास्तविक पाहता केंद्र सरकारने या बाबतीत अजूनपर्यंत कोणताच कायदा केलेला नाही. राज्य सरकारचा भूसंपादन कायदा अस्तित्वात आहे. त्या संदर्भात ही अधिसूचना काढलेली आहे. अस्तित्वात असलेल्या भूसंपादन कायद्यात कोणतीही सुधारणा न करता, राज्य सरकारने जी अधिसूचना काढलेली आहे ती विधिबाह्य आहे. शिवाय सभागृह सुरु असताना अशा प्रकारची अधिसूचना काढणे गैर आहे. महोदय, मी सन्माननीय श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, अशी अनेक विधेयके आहेत की, ती लॅप्स होऊ शकतात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले ती वस्तुस्थिती आहे. महोदय, या विभागाचे माननीय राज्यमंत्री श्री.संजय राठोड चॅनेलवर असे म्हणाले की, या विषयीची नस्ती जेव्हा त्यांच्याकडे सहीसाठी पाठविण्यात आली त्यावेळी त्यांनी त्या नस्तीवर सही करण्यास नकार दिला. हे सर्व आम्ही वाहिन्यांवर बघितले आहे. याचा अर्थ असा आहे की, सरकारमध्ये रूल्स ऑफ बिझनेसप्रमाणे काम होत नाही. त्यामुळेच या विषयावर नियम 289 अन्वये सर्व कामकाज बाजूला सारून चर्चा घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, काही अधिकारी या सरकारमधील मंत्र्यांना 'स्टुपिड' म्हणतात. आमच्या काळात आम्हाला असे कोणी म्हटले नव्हते आणि आम्ही कोणाची गयही केली नव्हती. माननीय श्री.विनोद तावडे, आपण भारतीय जनता पक्षाचे मंत्री नसून, तुम्ही आमचे सुध्दा मंत्री आहात. तुम्हाला जर अधिकारी 'स्टुपिड' म्हणत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याची हिंमत तुम्ही दाखविली पाहिजे. या विषयी खालच्या सभागृहात निवेदन करण्यात आल्याचे आपण जरी सांगत असला तरी, या सभागृहात त्या विषयी निवेदन झालेले नाही. या सभागृहात सुध्दा निवेदन होणे आवश्यक आहे. कोणतीही अधिसूचना काढत असताना ती सभागृहाला ज्ञात होणे आवश्यक आहे. माझे स्पष्ट मत आहे की, ती अधिसूचना अस्तित्वात असलेल्या भूसंपादन कायद्याच्या बाबतीत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

ती अधिसूचना स्वतंत्रपणे काढलेली आहे. ती अधिसूचना स्टुपिडपणामुळे काढली आहे की कसे ? माननीय राज्यमंत्र्यांनी रूल्स ऑफ बिझनेसप्रमाणे या नस्तीवर सही करण्यास नकार दिलेला असताना सुध्दा त्यावर मंत्री महोदयांनी सही केल्याचे संबंधित विभागाचे माननीय राज्यमंत्री वाहिन्यावर सांगत आहेत. माननीय राज्यमंत्र्यांची भूमिका वेगळी आणि सरकारमधील दुसऱ्या पक्षाच्या मंत्र्यांची भूमिका वेगळी असल्यामुळे या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे. माननीय सभापती महोदय, आपण जे आदेश दिले त्या बाबतीत मी हरकत घेत नाही. परंतु या विषयी चर्चा झाली नाही तर राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या मनात साशंकता निर्माण होऊ शकते. कारण अधिसूचना काढली म्हणजे तिची अंमलबजावणी करण्याचे काम तातडीने सुरु होते. त्यामुळे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घ्यावी, असे आमचे मत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना मी एका गोष्टीची माहिती देतो की, संबंधित अधिकाऱ्यांनी उच्चारलेला शब्द वेबसाईटवर आलेला आहे. या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली आहे की, या संदर्भात ज्या अधिकाऱ्यांची चूक आहे त्यांच्यावर कारवाई केली जाईल. नाही तर लोकांना असे वाटेल की, मलाच कोणी तरी 'स्टुपिड' म्हटले आहे. सन्माननीय श्री.सुनील तटकरेजी आपण आणि माननीय उप सभापती महोदय, माझ्या पाठीशी असल्यामुळे अशी हिंमत कोणाची होणार नाही. ज्या अधिकाऱ्याकडून चूक झाली आहे त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली जाईल, अशी सरकारने अगोदरच घोषणा केलेली आहे. मी निदर्शनास आणून देतो की, गुगलवर मराठी मजकुराचे इंग्रजी भाषेमध्ये भाषांतर करताना ही चूक झाली आहे. परंतु शेवटी चूक ही चूकच आहे. या बाबतीत सरकार संबंधितांवर कारवाई करणार आहे. मला शेवटी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनद्वारे एवढेच सांगायचे आहे की, अधिसूचना आणि अध्यादेश यातील फरक सन्माननीय नेत्यांना समजला पाहिजे.

उप सभापती : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अध्यादेश नेमका काय आहे हे मी स्वत: तपासून बघेन. त्यानंतर आपल्या मनातील शंकांना उत्तर देईन. तसेच चर्चेचे नियोजन आपल्याला कळविण्यात येईल. आता मी पुढील कामकाज पुकारतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सभापती....

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे. आपण जर अशाप्रकारे गोंधळ घालत राहीला तर मला नाईलाजास्तव कामकाज रेटून न्यावे लागेल.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.दिलीप कांबळे (अल्पसंख्याक विकास राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2006-2007 या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये महिला व बालविकास विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवते.

उप सभापती : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : माझ्याकडे दिनांक 6 एप्रिल, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "राज्यात नाशिकसह आठ जिल्ह्यांसाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामधून या वर्षी सामूहिक शेततळ्यासाठी भौतिक आणि आर्थिक लक्षांक दिला नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, 2015 मध्ये निदर्शनास आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी "ठाणे जिल्ह्यात मोकाट कुत्र्यांनी 1300 व्यक्तींचे लचके तोडण्याच्या घडलेल्या घटना तसेच तळोजा परिसरातील खुटारी गावात कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात प्रतिक्षा हिचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क माफ करण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, किरण पावसकर यांनी "दिनांक 2 फेब्रुवारी, 2015 रोजी चोरीच्या संशयावरून अटक करण्यात आलेल्या हरी चव्हाण या आरोपीचा मुंबई येथील मालवणी पोलीस कोठडीत संशयास्पदरित्या झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, किरण पावसकर यांनी "नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी सरकारने भरीव निधी उपलब्ध करून दिला असतानाही शिर्डी येथील साई संस्थानच्या खजिन्यातून आणखी निधी उपलब्ध करून देण्याची केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "मंडणगड तालुक्यात (जि.रत्नागिरी) 7/12 चे उतारे देण्याची ऑनलाईन प्रक्रिया ठप्प झाल्याने रजिस्ट्रेशन व इतर व्यवहारही बंद होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "डोंबिवली मानपाडा येथे 14 वर्षाच्या मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याची बाब दिनांक 03/04/2015 रोजी उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "नवीन पनवेल, कोळवाडी येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या मालकाने शासनाकडून भाडे थकीत झाल्यामुळे 192 विद्यार्थ्यांना वसतिगृहाबाहेर काढल्याने ऐन परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांची झालेली गैरसोय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी "संसदीय कार्य विभागाने दिनांक 30 मार्च, 2015 रोजी गुगल ट्रान्सलेटरच्या सहाय्याने मराठीतून इंग्रजीत भाषांतरीत केलेल्या मथळ्यात मंत्री महोदयांचा उल्लेख 'स्टुपिड' मंत्री असा करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "संविधानद्वेषाने पछाडलेल्या जाहेद नावाच्या निर्माता व दिग्दर्शकाने 'तेरे इश्क मे कुरबान' या चित्रपटात महामानव डॉ.बाबासाहेब

..7..

आंबेडकर व भारतीय संविधानाची खिल्ली उडविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : मंगरूळ तलावात (वडद, ता.कुही) 7 तरूणांचा बुडून मृत्यू होणे, या बाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विनोद तावडे (सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : शासकीय आश्रमशाळांतील सोलर वॉटर हिटर व बायोमेट्रिक यंत्रणा खरेदीत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्या प्रकरणी नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीला वारंवार मुदतवाढ देणे, याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव उपप्रश्न विचारण्याचा प्रयत्न करतात.)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : बीड जिल्ह्यात लाभार्थ्यांना संजय गांधी व श्रावणबाळ सारख्या निराधार योजनांचे अनुदान नियमित न मिळणे, याबाबत श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

उप सभापती : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 3 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.39 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

तालिका सभापती : आता आपण लक्षवेधी सूचना घेणार आहोत. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपल्या जागेवर जाऊन बसावे.

(गोंधळ)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 04.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 03.02 ते दुपारी 04.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी उप सभापती)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

उप सभापती : मी सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे यांना बोलण्याची संधी देतो. कृपया सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, केंद्र शासनाने दिनांक 7 एप्रिल, 2015 पासून भूसंपादन कायदा लागू करण्याचा निर्णय घेतला असून राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना राज्य शासनाने अधिसूचना जारी केली आहे. पूर्वीच्या कायद्यातील कलम 2 व 3 च्या तरतुदीनुसार जमीन अधिग्रहण करीत असताना 80 टक्के जमीन मालकांची संम्मती बंधनकारक होती. त्याचप्रमाणे जमीन चौपट दराने घेत असताना 15 टक्के विकसित जमीन शेतकऱ्यांना परत करणे बंधनकारक होते.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

परंतु, राज्य शासनाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार आता 80 टक्के जमीन मालकांची संमती घेण्याची गरज राहणार नाही. शेतजमीन वा निवासी घरे असलेली जमीन अधिग्रहण करण्याच्या संदर्भात राज्य शासनाने जी अधिसूचना काढलेली आहे, त्याबाबत आम्ही राज्य शासनाचा निषेध करतो, धिक्कार करतो. या अधिसूचनेला आम्ही स्पष्टपणे विरोध करीत आहोत. सदर अधिसूचनेला विरोध आहे, अशा प्रकारचा ठराव या सदनात मांडण्यात यावा, त्यावर चर्चा करावी आणि तो मंजूर करावा, अशी आमची एकमुखी मागणी आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय गटनेत्यांनी माहिती घेऊन सभागृहात भाष्य केले पाहिजे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे ती अधिसूचना नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

उप सभापती : सभागृहाची बैठक मी दुपारी 4.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 04.04 ते 04.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक मी पुन्हा 30 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 4.30 ते 5.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

पृ.शी. : महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IV OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATIONS ACT, THE MAHARASHTRA CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 4- मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 4 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>वि.स.वि.क्रमांक 6 बाबत</u>

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 6-नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचरलनगर साहिब (सुधारणा) विधेयक चर्चेला घेण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभापती : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 03 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक सायंकाळी 5.25 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5.13 ते 5.25 पर्यंत स्थगित झाली.)

नंतर पी.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

पृ.शी. : नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO.VI OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE NANDED SIKH GURUDWARA SACHKHAND SHRI HAZUR APCHALNAGAR SAHIB ACT, 1956.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव दिला आहे. तो त्यांनी मागे घ्यावा अशी मी विनंती करतो.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

उप सभापती : माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांना विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा आपला प्रस्ताव मागे घ्यावयाचा आहे काय ?

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी मी जो प्रस्ताव दिलेला आहे, तो मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 6 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 6 संमत झाले आहे.

.....

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

पृ.शी. : महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IV OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATIONS ACT, THE MAHARASHTRA CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 4- मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7(दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 4 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 4 संमत झाले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या सकाळी 10 वाजता घेण्यात येईल. सकाळी 10.30 ते 11.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीत राहिलेल्या लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 31 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 7 एप्रिल, 2015 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION